प्रकरण ५
पत्र ४

## प्रेरणा प्रकल्प-शेतकरी समुपदेशन आरोग्य सेवा कार्यक्रम
## संक्षिप्त टिपणी.

*****************************************************************************

शासन निर्णय क्रमांक शासन निर्णय क्र.माआका - २०१५/प्र.क्र.३०६/आरोग्य-३ (अ) दिनांक ०४/०९/२०१५ व शासन निर्णय क्र.माआका-२०१५/प्र.क्र .३०६/आरोग्य -३ (अ) दिनांक २४/११/२०१५ अन्वये, राज्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्हयातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष मदतीचा कार्यक्रम माहे ऑक्टोबर २०१५ पासून मराठवाडा विभागातील ९ जिल्हे व विदर्भातील ५ जिल्हे असे एकुण १४ जिल्हयांत सार्वजनिक आरोग्य विभाग व महसूल व वन विभाग यांचे शासन निर्णयाव्दारे अंमलात आणण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे .

प्रेरणा प्रकल्प-शेतकरी समुपदेशन आरोग्य सेवा कार्यक्रमांतर्गत १४ जिल्हयापैकी मराठवाडा विभागातील ९ जिल्हयांचा तर विदर्भ विभागातील ५ जिल्हयांचा समावेश आहे. (जिल्हे- नांदेड ,औरंगाबाद ,जालना,बीड, हिंगोली, लातूर, अकोला,यवतमाळ, वाशिम ,परभणी ,उस्मानाबाद,अमरावती,बुलढाणा व वर्धा) . यामध्ये नऊ जिल्हयांमध्ये प्रेरणा प्रकल्प-शेतकरी समुपदेशन आरोग्य सेवा कार्यक्रमांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत कार्यक्रम राबविण्यात येतो तर उर्वरित पाच जिल्हयांमध्ये जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे मार्फत कार्यक्रम राबविण्यात येतो.

प्रेरणा प्रकल्प-शेतकरी समुपदेशन आरोग्य सेवा कार्यक्रमांतर्गत गावातील आशांमार्फत सर्वेक्षण करण्यात येवुन नैराश्यग्रस्त लोकांचा शोध घेण्यात येतो व त्यांचे मार्फत पुढील उपचाराकरीता संदर्भित करण्यात येते. या करीता आशांना प्रशिक्षण देण्यात आलेले असुन आपणांस कोणत्याही प्रकाराचा ताणतणाव अथवा नैराश्य वाटत असेल तर आपण आपल्या गावतील आशांशी संपर्क साधावा .

तसेच महाराष्ट्र शासनाची **१०४ ही फ्री हेल्पलाईन नं** सुरु करण्यात आलेली असुन या मार्फत लोकांचे समुपदेशन करण्यात येते तसेच राज्यामध्ये टेलीमानस या केंद्रशासनाच्या प्रकल्पांतर्गत तीन विभागींय कॉल सेंटर सुरु करण्यात आले असुन ( पुणे,ठाणे व बीड) **१४४१६ हा टोल फ्री क्रमांक आहे**, याव्दारे लोकांना २४*७ मानसिक समुपदेशनाची सेवा देण्यात येत आहे. तसेच राज्यातील ३४ जिल्ह्यामध्ये जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम राबविला जातो या मार्फत सुध्दा आपणास मानसिक आरोग्याशी संबंधित उपचार व समुपदेशन करण्यात येते .

प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मनशक्ती क्लिनीक सुरु करण्यात आले असुन वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत मानसिक आजारांचे निदान व उपचार करण्यात येत आहे. तसेच उपकेंद्र स्तरावर सर्व समुदाय आरोग्य अधिकारी यांचे मानसिक आजाराविषयक प्रशिक्षण घेण्यात आले असुन त्यांचेमार्फत समुपदेशन व संदर्भ सेवा देण्यात येत आहेत.

तरी शेतकरी बांधवांना नम्र विनंती आहे की आपण सदर कार्यक्रमाचा आवश्य लाभ घ्यावा व काही अडचण असल्यास **१०४ किंवा १४४१६ या टोल फ्री क्रमांकावर कॉल** करुन आपल्या मनातील शंकांचे निरसन करुन घ्यावे किंवा आपल्या जवळील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय किंवा जिल्हा रुग्णालयात संपर्क साधावा.